# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 20 February 2025

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – २० फेब्रुवारी २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- छत्रपती संभाजीनगर इथल्या ऑरिक सिटीला देशातलं उत्तम औद्योगिक क्षेत्र करण्याचा संकल्प केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांच्याकडून व्यक्त.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभासाठी उपराष्ट्रपती जगदीप धनखड शनिवारी छत्रपती संभाजीनगर दौऱ्यावर.
- शासनाच्या फसवणूक प्रकरणी कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांना दोन वर्ष कारावास आणि ५० हजार रुपये दंड–न्यायालयाकडून जामीनही मंजूर.
- दिल्लीत उद्यापासून साहित्य जागर–छत्रपती संभाजीनगर इथं विद्रोही साहित्य संमेलन.

आणि

- आयसीसी अजिंक्यपद चषक क्रिकेट स्पर्धेत आज भारत बांगलादेश लढत सुरू.

****

छत्रपती संभाजीनगर इथल्या ऑरिक सिटीला देशातलं उत्तम औद्योगिक क्षेत्र करण्याचा संकल्प असून येत्या काळात मराठवाडा हे सर्वात मोठं औद्योगिक हब असेल, असं केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांनी म्हटलं आहे. ते आज छत्रपती संभाजीनगर इथे वार्ताहरांशी बोलत होते. या औद्योगिक क्षेत्रात कौशल्य विकास केंद्र तसंच स्टार्ट अप इन्क्युबेशन हब बनवण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली. ते म्हणाले...

***ऑरिक की बिल्डींग है, उसमे बीस हजार स्केअर फीट का एक कौशल्य विकास केंद्र, स्टील डेव्हलपमेंट सेंटर बनाने का कल निर्णय लिया है। साथ ही साथ लगभग दस हजार स्केअर फीट का स्टार्टअप इनक्यूबेशन हब बनाने का निर्णय लिया गया***

***है। वहा पर कमर्शियल इन्फ्रास्ट्रक्चर, एक अस्पताल बन रहा है वहा पर, एक युनिवर्सिटी आ रही है। साथ ही साथ स्कुल हो व्हॅक्रीसीएशन फॅसीलीटी हो इन सब चिजो की और ध्यान केंद्रीत करते हुये हम इस पुरे औद्योगीक क्षेत्र को महाराष्ट्र और देश की शान बनाने के लिये संकल्पीत है।***

****

उपराष्ट्रपती जगदीप धनखड परवा २२ तारखेला छत्रपती संभाजीनगरच्या दौऱ्यावर येणार आहेत. या दौऱ्यात ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या ६५ व्या दीक्षांत समारंभाला प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहतील. कुलपती तथा राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा होणार आहे, अशी माहिती विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. या दीक्षांत समारंभात ऑक्टोबर– नोव्हेंबर २०२३ आणि मार्च–एप्रिल २०२४ या परीक्षेत उत्तीर्ण परीक्षार्थ्यांना पदव्या प्रदान करण्यात येणार आहेत. या दोन्ही परीक्षेत पदविका, पदवी, पदव्यूत्तर पदवी प्राप्त विद्यार्थी तसंच १४ जून २०२४ ते ८ फेब्रुवारी २०२५ या दरम्यान पीएच.डी प्राप्त करणाऱ्या संशोधकांनाही पदव्या प्रदान करण्यात येतील.

एकूण ५६ हजार १२२ विद्यार्थ्यांनी या सोहळयास पदवी घेण्यासाठी अर्ज केले आहेत.

दरम्यान पीएम उषा प्रकल्पातंर्गत बांधण्यात आलेल्या विद्यापीठाच्या ४ इमारतींचं आभासी पद्धतीने भूमिपूजन आणि संविधान जागृती वर्षाच्या अमृत महोत्सवानिमित्त सरस्वती भुवन शैक्षणिक संस्थेत आयोजित कार्यक्रमाचंही उद्धाटनही उपराष्ट्रपती करणार आहेत. आपल्या या दौऱ्यात वेरुळ लेणी आणि घृष्णेश्वर मंदिरालाही उपराष्ट्रपती भेट देणार आहेत.

****

राज्याचे कृषिमंत्री सिन्नरचे आमदार माणिकराव कोकाटे यांना आज नाशिकच्या न्यायालयानं दोन वर्षाचा कारावास आणि ५० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. १९९५ ते १९९७ या कालावधीत माणिकराव कोकाटे आणि त्यांचे भाऊ शिवाजी कोकाटे यांनी आपल्याला स्वतःचं घर नसल्याचे खोटे कागदपत्र देऊन शासनाची फसवणूक करत नाशिकमध्ये उच्चभ्रू वसाहतीत मुख्यमंत्री कोट्यातून घर मिळवलं तसंच आपल्या नावावर २ सदनिका घेतल्याचा आरोप माजी मंत्री तुकाराम दिघोळे यांनी केला होता. यासंदर्भातला खटला २८ वर्ष चालल्यानंतर आज न्यायालयानं

कोकाटे यांना ही शिक्षा ठोठावली. दरम्यान, कोकाटे बंधूंनी जामीनासाठी अर्ज दाखल केला, न्यायालयानं तो मान्य करत, त्यांना दोघांनाही जामीन मंजूर केला.
दरम्यान राजकीय वैमानस्यातून हा प्रकार झाला असून यासंदर्भात वरिष्ठ न्यायालयात दाद मागणार असल्याचं माणिकराव कोकाटे यांनी म्हटलं आहे.
दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने कोकाटे यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कोकाटे यांचा तत्काळ राजीनामा घ्यावा, असं या पक्षाचे मुख्य प्रवक्ते महेश तपासे यांनी म्हटलं आहे.

****

महाराष्ट्र राज्य सरकारी कर्मचारी आणि निवृत्तीवेतन धारकांना सामान्य भविष्य निर्वाह निधी जीपीएफ खात्यातील शिल्लक आणि इतर तपशील आता ऑनलाइन पाहण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. प्रधान महालेखापाल कार्यालयाच्या cag.gov.in/ae/nagpur/en या अधिकृत संकेतस्थळावर ही सुविधा उपलब्ध आहे. मराठवाडा तसंच विदर्भातले निवृत्तीवेतनधारक आणि जी पी एफ अभिदात्यांना या सुविधेचा लाभ घेता येईल. यासोबतच अंतिम पेन्शन प्रकरणांचा तपशील ऑनलाइन पाहण्याची सुविधाही पेन्शनधारकांना उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

****

संत गजानन महाराजांचा एकशे सत्तेचाळीसावा प्रगट दिन आज राज्यभरात सर्वत्र साजरा होत आहे. छत्रपती संभाजीनगर शहरातल्या संत गजानन महाराज मंदिरात दर्शनासाठी सकाळपासूनच भाविकांची मोठी गर्दी आहे. शहरात विविध ठिकाणी गजानन विजय ग्रंथांचं पारायण करून महाप्रसादाचं आयोजनही आज करण्यात आलं आहे.

****

९८ वं अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन उद्यापासून दिल्लीत सुरु होत आहे. डॉ. तारा भवाळकर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या संमेलनाचं उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. संमेलनाचे स्वागताध्यक्ष शरद पवार, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी उपस्थित असतील. दिल्लीतल्या तालकटोरा क्रीडा संकुलात उभारलेल्या छत्रपती शिवाजी महाराज साहित्यनगरीत तीन दिवस चालणाऱ्या या संमेलनात, मान्यवरांच्या मुलाखती, बहुभाषिक कवी संमेलन, विविध विषयावर परिसंवाद, आदी कार्यक्रम होणार आहेत.

या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला एकूण चार कोटी रुपये निधी देण्याचा निर्णय राज्यसरकारनं घेतला आहे. दरवर्षी साहित्य संमेलनासाठी दोन कोटी रुपये निधी स्वरुपात दिले जातात. मात्र साहित्यिक आणि साहित्य रसिकांवरचा वाढलेला खर्च, संमेलनाचं वेगळेपण यासारख्या कारणांमुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या संमेलनासाठी अतिरीक्त दोन कोटी रुपये देण्यास, विशेष बाब म्हणून मंजुरी दिली आहे.

दरम्यान, मराठी भाषेला मिळालेला अभिजात दर्जा वाढवणं आणि टिकवणं, ही मराठी भाषिकांची जबाबदारी असल्याचं प्रतिपादन नियोजित संमेलनाध्यक्ष डॉ तारा भवाळकर यांनी केलं आहे. त्या म्हणाल्या...

***केवळ कुठेतरी सरकारी शिक्कामोर्तब झालं म्हणून भाषेसारख्या गोष्टीचा दर्जा एकदम वाढत नाही. त्यातनं काही आर्थिक फायदे होण्याची शक्यता आहे. शासनाकडून मराठी भाषिकांना, संस्थाना, विद्यापीठांना किंवा नवीन येणाऱ्या साहित्यीकांना, संशोधकांना काही आर्थिक काही आर्थिक साहाय्य होऊ शकेल. त्याने प्रकाशन संस्था निघू शकतील आणि निघाव्यात आणि त्याच्यासाठी मराठी जाणकार भाषिकांनी जास्त प्रयत्न करायला पाहिजे. नुसता दर्जा मिळाला म्हणून स्वस्थ बसून चालणार नाही. तो दर्जा वाढवणं आणि टिकवणं हे माणसांच्या,भाषिकांच्या हातात आहे.***

****

१९ वं अखिल भारतीय विद्रोही मराठी साहित्य संमेलन छत्रपती संभाजीनगर इथल्या आमखास मैदानावर उद्यापासून सुरू होत आहे. इथं उभारण्यात आलेल्या मलिक अंबर नगरीत तीन दिवस चालणाऱ्या या विद्रोही मराठी संमेलनाच्या अध्यक्षपदी लोकसाहित्याचे अभ्यासक डॉ.अशोक राणा यांची निवड करण्यात आली आहे. या संमेलनात सहा परिसंवाद, १४ गटचर्चा, एक विशेष व्याख्यान, काव्यपहाट मैफिल, गझल संमेलन, चार कविसंमेलनं, कथाकथन, नाट्यवाचन, एकपात्री प्रयोगासह दोन एकांकिका, आदिवासी गाणी, कला दर्शन, लोककलांचे सादरीकरण तसंच महाराष्ट्र दर्शन इत्यादी सादरीकरण होणार आहे. खास मंडपातील आठ कला दालनात चित्रकाव्य, शिल्पकला, सुलेखन, चित्रकला, कलात्मक फलकलेखन, रांगोळी, व्यंगचित्र अशा कला प्रकारांचे सादरीकरण होईल.

****

नवव्या आयसीसी अजिंक्यपद करंडक क्रिकेट स्पर्धेत बांगलादेशनं भारतासमोर २२९ धावांचं लक्ष्य ठेवलं आहे. दुबईत सुरू असलेल्या या सामन्यात बांगलादेशनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. मात्र बांगलादेश संघाचे सर्व गडी २२८ धावांवर बाद झाले. मोहम्मद शमीने पाच, हर्षित राणाने तीन तर अक्षर पटेलनं दोन बळी घेतले आहेत.

****

नांदेड इथं उद्यापासून राज्यस्तरीय महसूल क्रीडा आणि सांस्कृतिक स्पर्धांचं आयोजन करण्यात आलं आहे. महसूल विभागातले जवळपास अडीच ते तीन हजार अधिकारी आणि कर्मचारी खेळाडू या स्पर्धेत सहभागी होणार आहेत. नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी आज पत्रकार परिषद घेऊन स्पर्धेसाठीची तयारी पूर्ण झाली असल्याची माहिती दिली.

****

छत्रपती संभाजीनगर इथल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय – घाटीतल्या परिचारिकांनी आज विविध मागण्यांसाठी काम बंद आंदोलन पुकारलं. आपल्या मागण्यांचं निवेदन परिचारिका संघटनेच्या वतीने रुग्णालय प्रशासनाला देण्यात आलं.

****

नांदेड जिल्ह्यात श्री क्षेत्र गोरठे इथल्या वरद प्रतिष्ठानच्या वतीने प्राध्यापक ललिता गादगे यांना काशीबाई फुलारी स्मृति नारायणी पुरस्कार जाहीर झाला आहे. पाच हजार रुपये आणि मानपत्र असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. येत्या २७ फेब्रुवारीला गोरठा इथे आयोजित पाचव्या मराठी साहित्य संमेलनाच्या उद्घाटन सोहळ्यात त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येईल.

****

आद्य पत्रकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त आज त्यांना अभिवादन करण्यात येत आहे. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे लेखाधिकारी संजय कोलते यांच्या हस्ते बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आलं.

****